# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/02/2024 (मंगळवार) दुपार


---

### खापा येथील कुख्यात वाळु तस्कर योगेश उर्फ योगेश्वर उदाराम गोखे याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन खापा अंतर्गत येणाऱ्या गडेवालपुरा खापा परीसरात राहणारा कुख्यात वाळु तस्कर योगेश उर्फ योगेश्वर उदाराम गोखे, वय ५० वर्ष, रा. गडेवालपुरा खापा ता. सावनेर जि. नागपूर हा मागील ०५ वर्षापासून खापा परिसरात शासनाची दिशाभूल करून रेतीचे अवैध उत्खनन करून वाळु तस्करी द्वारे शासनाचा महसूल बुडवून शासनाला मोठे आर्थिक नुकसान करणे व पर्यावरणाला धोका निर्माण करणे या सारखे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द पोलीस व तहसिल कार्यालय द्वारे वाळु तस्करीचे गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले होते. परंतु योगेश उर्फ योगेश्वर याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर हद्दपार सारखे प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली होती. परंतु योगेश उर्फ योगेश्वर याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. योगेश उर्फ योगेश्वर याचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागेपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि. ०५/०२/२०२४ रोजी कुख्यात वाळु तस्कर योगेश उर्फ योगेश्वर उदाराम गोखे याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढुन त्यास आज दिनांक ०६/०२/२०२४ रोजी ०१ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन खापा येथील तत्कालीन ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकुर, सहायक फौजदार सुरज परमार, पोलीस हवालदार निलेश बर्वे, पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

<u>**पो.स्टे. कुही येथील जुगार अड्डयावर धाड**</u>

<u>**पोलीस स्टेशन कुहीची कारवाई**</u>

दिनांक ०५/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कुही येथील टाकळी शिवार येथे काही इसम हे पैश्याची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहेत. अशी गोपनिय माहीती प्राप्त झाले वरून पोलीस स्टाफ यांनी टाकळी शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे– ०१) सलाउद्दीन यासुद्दीन वय ४२ वर्ष रा. मोमीनपुरा नागपुर ०२) वतन दादारावजी राउत वय ३७ वर्ष, रा. जुनी बिडीपेठ नागपुर ०३) दिलीप गौतम वहाने, वय ४३ वर्ष, रा. न्यु बिडीपेठ नागपुर ०४) मुजीब अहमद जमीर अहमद वय ४० वर्ष, रा. मोहमीनपुरा नागपुर ०५) जितु जागोबाजी दगडे वय ४५ वर्ष रा. भांडेप्लॉट नागपुर** हे तासपत्त्यांवर पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन नगदी ४०३७०/– रू. व ५२ तासपत्ते किंमती ५०/– रू. असा एकुण ४०३७५/–रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कुही येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही ही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात प्रभारी कुही ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक अमितकुमार आत्राम, पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, सोनकुसरे, पोलीस हवालदार चांगदेव कुथे, हरीदास चाचरकर पोलीस अंमलदार आशिष खंडाईत, अनिल करडखेले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**